-: प्रेसनोट :-                    दिनांक :- १९/११/२०२३

## वैद्यकिय पदवी व परवाना नसताना अवैध व्यवसाय करणाऱ्या बोगस डॉक्टरवर मुंबई गुन्हे शाखेची कारवाई

....................................................................................................

मुंबई मधील शिवाजीनगर, गोवंडी परिसरात, वैद्यकीय क्षेत्रातील कोणत्याही शाखेची पदवी संपादीत न करता किंवा कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय शिक्षण नसताना नागरीकांवर वैदयकीय उपचार करून त्यांचे आरोग्य धोक्यात टाकून त्यांच्याकडून भरमसाठ फी घेवून सामान्य नागरीकांची फसवणुक करणाऱ्या बोगस डॉक्टरबाबत मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष ६ कार्यालयास विश्वसनीय माहिती प्राप्त झाली.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने कक्ष ६ कार्यालयतील पोलीस पथक हे सहाय्यक वैद्यकिय अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, 'एम वॉर्ड पूर्व' देवनार, मुंबई यांचे सह शिवाजीनगर परिसरातील एका क्लिनिक मध्ये छापा टाकला असता, तेथे बोगस डॉक्टर नामे अल्ताफ हुसेन मोहमद निजाम खान, वय ५० वर्षे हा रूग्णांची तपासणी करून त्यांचेवर औषधोपचार करताना मिळून आला.

नमुद बोगस डॉक्टरांकडे कोणताही अधिकृत वैद्यकिय परवाना नसताना तसेच महाराष्ट्र मेडीकल कौन्सिल मध्ये नोंदणी नसताना डॉक्टर असल्याचे भासवुन बेकायदेशिररित्या विविध आजारावरील रूग्णांवर औषधेपचार करताना मिळुन आला. त्याच्या ताब्यातुन स्टेथेस्कोप, वेगवेगळया प्रकारचे इंजेक्शन बॉटल्स, सिरींज, अॅन्टीबायोटिक टॅबलेट्स असे वेगवंगळया प्रकारचे औषधे व वैद्यकिय साहित्य पंचनाम्यांतर्गत जप्त करून, त्याचेविरूध्द शिवाजीनगर पोलीस ठाणेस गु.र.क्र. ५८३/२०२३,(सीसीटीनएसनं १०२२/२३), कलम ४१९,४२० भा.दं.वि.सं. सह कलम ३३,३६ महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर्स अॅक्ट १९६१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. राज तिलक रौशन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डी/पुर्व), श्री. चंद्रकांत जाधव यांचे मार्गदर्शनाखाली कक्ष ६ चे प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. रविंद्र साळुंखे, पो.नि. प्रशांत पवार, पो.नि. हणमंत ननावरे, पो. उप. नि. सुभाष मुठे, म.पो. उप. नि. कल्पना माशेरे, पो.उप.नि. नंदकुमार बेळणेकर, स.फौ. २७५३५/सावंत, स.फौ. २७५३९/सकपाळ, स.फौ. ३९५९/कुरडे, पो.ह.क्र.३१९५६/पारकर, पो.ह.क्र.९७१०६१/चव्हाण, पो. ह.क्र. ०३०९९५/ जाधव, पो.ह.क्र. ०४०३६३/शिंदे, पो.शि.क्र. ०६१७०३/घेरडे, पो.शि.क्र. ०८०२९६/कोळेकर, म.पो.शि. ०८१४२६/अभंग, पो.शि.क्र. ०९०३१९७/ पवार, पो.ना.चा.क्र. ००६७४/कदम, आणि पो.शि.चा.क्र. १७१३६५/पाटील यांचे पथकाने पार पाडली आहे.